**प्रसिद्धिपत्रक**

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६
फोन नं. ०२०-२६६८५०००

जा.क्र./पोउआ/वाह/६४२६ /२०२४ पुणे दिनांक -१० /०९/२०२४

पुणे शहरातील वानवडी वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, वानवडी वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापर्वी काही संदर्भातील आदेश असतील ते रद्द करण्यात येत आहे.

**वानवडी वाहतूक विभाग पुणे अंतर्गत घोरपडी येथे पुणे - मिरज रेल्वे लाईनवर रेल्वे उड्डाणपुलाचे कामामुळे घोरपडी रेल्वेगेट (मिरज रेल्वे लाईन) परिसरामध्ये सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतुकीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.**

## वानवडी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

- **वॉर मेमोरियल कडून घोरपडी रेल्वे गेट मार्गे मुंढवाकडे जाणारी वाहने केंद्रीय विद्यालय जक्शंन ते घोरपडी पोलीस चौकी मार्गे जातील**
- मुंढवा, घोरपडी रेल्वे ब्रीजवरुन (सोलापुर रेल्वे लाईन) वॉर मेमोरियल कडे फक्त दुचाकी, तीन चाकी व चारचाकी कार यांनाच प्रवेश आहे. उर्वरीत सर्व प्रकारची मालवाहतुक करणारी चारचाकी वाहने, जड, अवजड वाहने तसेच सर्व प्रकारच्या बसेस, पीएमपीएल सह यांना प्रवेश बंद राहील.

**प्रयायी मार्ग - मुंढवा कडून येणारी वरील सर्व प्रवेश निषिध्द केलेली वाहने हि घोरपडी रेल्वे उड्डाणपुल (सोलापूर रेल्वे मार्ग) सरळ बी.टी. कवडे रोडवरुन सोपान बाग जंक्शन येथून सोलापूर रोडला येवून इच्छित स्थळी जातील.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे यांचे कार्यालयात दिनांक -११/०९/२०२४ ते दिनांक -२५/०९/२०२४ पर्यत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकतींचा विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी वानवडी** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**